Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# जालना एक ऐतिहासिक शहर

**श्री. ज्ञानदेव शिवनाथ नागवे**
संशोधक विद्यार्थी (इतिहास विभाग)
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

मराठवाडा विभागातील जालना जिल्हयाची निर्मिती सन १९८१ मध्ये झाली असली तरी, तत्पुर्वी स्वातंत्र्यपुर्व हैद्राबाद निजाम काळात हा काही काळ जिल्हा म्हणुन अस्तित्वात असल्याची नोंद आहे. मध्ययुगीन काळात महत्वाचे व्यापारी केंद्र असलेल्या या शहराचा उगम व विकास पाहणे इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचे ठरते.

**उद्दिष्ट्ये :-** १. जालना शहराचा मुळ इतिहास अभ्यासणे.

२.जालना शहरातील ऐतिहासिक स्थळे व वास्तु यांचा आढावा घेऊन त्यादृष्टीने ऐतिहासिक महत्व अभ्यासणे.

३. जालना शहराच्या ऐतिहासिक राजकिय स्थितीचा आढावा घेणे.

आज कुंडलिका नदीच्या दोन्ही तिरावर वसलेले जालना हे शहर विस्तीर्ण स्वरूपात असल्याचे दिसते. वरवर पाहता या शहराचा इतिहास फार पुर्विचा असावा असे वाटत नसले तरी या शहराची स्थापना प्राचीन काळी झाल्याचे पुरावे मिळतात. जालना शहराच्या स्थापनेबाबतचा सर्वात प्राचीन पुरावा रामायण काळापर्यंत मागे जातांना दिसतो. पारंपारिक आख्याहिकेनुसार असे म्हटले जाते की, रामाच्या सितेचे येथे काही काळ वास्तव्य राहिले होते, त्यामुळे या शहराचे नाव जनकपूर असे पडले. पुढे मुस्लीम सत्ताधिशांच्या काळात जनकपुर चे जालना असे नामांतर केले गेले [१]

जालना शहराच्या (गाव) नावाच्या संदर्भात महानुभावांच्या स्थानपोथीत ‘हिवराळी’, ‘हिवरडी’, ‘हिवरळ’ अशी असल्याचे मत प्रा. भगवान काळे यांनी आपल्या ‘आपला जालना जिल्हा’ या ग्रंथात नोंदविले आहे. या शिवाय जालेराव जाधव या येथील सरदाराच्या नावावरुन जालहनापूर म्हणुन हे गाव ओळखले जात असावे, असा संदर्भही याच ग्रंथात मिळतो.[२] जालहनापूर या नावाच्या संदर्भात इतर दुजोरेही मिळतात, या शहराजवळील गावातुन शहराकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या नावावरुन मिळतात. शहराच्या पुर्वेस असलेल्या वानडगावहुन जालनाकडे येणाऱ्या रस्त्याचे (पाणंदी) नाव जालनापूर रस्ता (पाणंदी) असे आहे.

मुलत: जालना, ज्यास आज जुना जालना म्हणुन ओळखले जाते तो होय. हे शहर कुंडलिका नदिच्या उजव्या तिरावर वसलेले होते. विटा व चिखलाच्या साह्याने तयार केलेल्या भिंतीची पुर्णत: तटबंदी

या शहरास होती व शहरात प्रवेश करण्यासाठी मुख्य दरवाजे असावेत. यापैकी शहराच्या एका बाजुस असलेल्या अंबर दरवाजाच्या अस्तित्वाचे पुरावे मिळतात. साहजिकच शहराच्या उत्तर दिशेला नदीकाठाकडुन एक दरवाजा असावा यात दुमत राहु शकत नाही, कारण हे स्थळ निश्चयणाचे मुळचं ही कुंडलिका नदी होय.[३] मध्ययुगात मलिक अंबरचा अधिकारी जमशाद खान याने सुंदर मशिदी तसेच शहराच्या पश्चिमेस मोती तलाव नामक तलावाचे निर्माण करुन शहरास अंतर्गत (भूमिगत) पध्दतीने पाण्याची व्यवस्था केलेली होती. याशिवाय पाण्याच्या सोयीसाठी इतर ४ विहीरींचे निर्माणही केले होते. उत्तरोतर या शहराचा विकास होऊन कुंडलिका नदीच्या डाव्या तिरावरही एक पेठ मध्यकालात निर्माण झाली. शहराच्या विरुध्द बाजुस विकास पावलेला हा भाग म्हणजे काद्राबाद पेठ होय. काद्राबाद पेठ संपुर्णत: दगडी बांधकामाच्या तटबंदीने सुरक्षित केलेली होती. तसेच या भागास चार दिशेने चार मुख्य दरवाजे होते, यापैकी तीन दरवाजे आज सुस्थितीत दिसतात, त्यापैकी पाणी दरवाजा (पाणी वेस) हा एक प्रसिध्द दरवाजा होय.

मोगल सत्ताधिश अकबराच्या काळात जालना हे शहर अबुल फजल या अधिकाऱ्याकडे होते. अबुल फजल काही काळ जालना शहरात वास्तव्यास होता. याच काळात आसफ जहॉंच्या आदेशान्वये इ.स. १७२५ मध्ये शहराच्या पुर्वेस काबिल खान याने पर्शियन कारागिरांकरवी एका किल्याचे बांधकाम केले, तोच मस्तगड किल्ला होय. नंतरच्या काळात हे शहर बराच काळ शिंदे घराण्याची जागीर होती, पुढे पुण्याच्या सरदारांच्या अखत्यारित आणि अखेरिस इ.स. १८०३ नंतर हैद्राबादच्या निजाम राज्याच्या अखत्यारित हा भाग होता.

**जालना शहरातिल ऐतिहासिक स्थळे व वास्तु :-**

शहराच्या स्थापनेच्या काळाची प्राचीनता लक्षात येण्याच्या दृष्टीने येथील मठ, मंदिरे, मशिदी, दर्गे, विहिरी, बारव, दरवाजे तसेच जिर्ण झालेल्या वस्तु व वास्तु महत्वाच्या ठरतात. शहरात जुणे गणपती मंदीर, भैराबा मंदीर, आनंदीस्वामी मंदीर, जान अल्ला (जानुल्ला) दर्गा, महादेव मंदीर, उदासीचे मंदीर, दत्त मंदीर, राम मंदीर, गैबीनाथ मंदीर, काळा मंदीर, माता मंदीर, वेशीचा मारुती, बालाजी मंदीर, वाघ मंदीर, शनी मंदीर, तुरुप हनुमान मंदीर, रोकड्या हनुमान मंदीर, ढवळेश्वर- खडकेश्वर- कुरंदेश्वर व नंदी मंदीर ही शिवमंदीरे तर दुर्गामाता, श्रीगायत्री ही स्त्री देवता मंदीरे, जामा मस्जीद, मस्जीद-ए-अफगाणा, मस्जीद-ए-कसाबान, मस्जीद-ए-टट्टुपूरा इ. २४ मशिदी, शिवाय मस्तगड किल्ला, जुना व नविन जालना भागातील विविध द्वार, मोती तलाव,[४] याशिवाय जैन मंदीरे, चर्च इ. वास्तु या शहरात आजही आहेत.

**राजकिय स्थित्यंतरे :**

साधारणत: ४०० ते ४५० वर्षापुर्वी एकुण ४४ घरांचे जालना हे गाव असल्याचे पुरावे मिळत असले [५] तरी या गावाच्या स्थापनेचा काळ प्राचीन काळापर्यंत जातांना दिसतो. प्राचीन ते मध्ययुगीन काळापर्यंतच्या राजकीय स्थितीबाबत लिखीत दुजोरा मिळत नसला तरी बादशहा अकबराच्या काळात जालना ही एक जहागीर असल्याचे लक्षात येते.६ तद्नंतर या भागावर काही काळ ब्रिटीशांचे तर सर्वाधिक काळ हैद्राबादच्या निजाम राज्याचा हा भाग राहिला आहे.

**निष्कर्ष :**

१. सितेच्या आख्याहिकेवरुन आजचे जालना शहर प्राचीन काळापासुन एक गावरुपाने अस्तीत्वात असावे असे निदर्शनास येते.

२. जालना शहरात असलेल्या विविध धर्मीय स्थळे व वास्तु यावरुन या शहरात सर्वधर्मीय लोक मध्ययुगीन काळापासुन गुण्यागोविंदाने राहत असावेत याचे दाखले मिळतात.

३. मध्ययुगीन काळापासुन जालना शहरावरील राजकिय नियंत्रण सातत्याने बदलत राहिले असल्याचे दिसुन आले.

**समारोप :**

महत्वाची व्यापारी पेठ असलेल्या जालना शहराच्या बाबतीत उपलब्ध कागदपत्रे व पुरावे यावरुन या शहराचा इतिहास जुना असल्याचे लक्षात आले आहे. सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय तसेच आर्थिक दृष्टिने या शहराचे महत्व मध्ययुगीन काळात होते, असे दिसते.

**संदर्भ :-**

1) Gazetter of the Nizam's Dominions, Aurangabad District, The Exucutive Editor and Secretary, Gazetteers Dept, Govt of Maharashtra. Mumbai, 2006. P. 860

२) काळे भगवान, आपला जालना जिल्हा, संकेत प्रकाशन, पार्वती अपार्टमेंट, मस्तगड, प्रथमावृत्ती, ७ मार्च १९९१, जालना, पृ. ६५ व ६८.

3) Gazetter of the Nizam's Dominions, Aurangabad District, The Exucutive Editor and Secretary, Gazetteers Dept, Govt of Maharashtra. Mumbai, 2006, p.859

४) काळे भगवान, उपरोक्त, पृ. ७१ ते ७६

५) कित्ता, पृ. ६८

6) Gazetter of the Nizam's Dominions, Aurangabad District, The Exucutive Editor and Secretary, Gazetteers Dept, Govt of Maharashtra. Mumbai, 2006,p. 860